# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६**

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ८,६०,४५,८३,६८,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (१) | ११९३ | १० | सांगली जिल्हा परिषदेच्या जिल्हयात एकूण १ हजार ६८६ शाळा आहेत. त्या शाळातील सुमारे ५ हजार ६२२ वर्गखोल्यांची स्थिती चांगली आहे. ५९५ वर्गामध्ये किरकोळ दुरुस्तीची गरज आहे. मात्र १ हजार ७५ वर्गखोल्या नादुरुस्ती आहेत. परिणामी काही ठिकाणी धोकादायक स्थितीतच विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मॉडेल स्कूलच्या उपक्रमामुळे ४४९ शाळांचे रूप पालटले आहे. मात्र सर्व शाळा दुरुस्तीसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची गरज व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. हारुन खान** |
| (२) | १११८ | १०० | वर्सोवा विधानसभा क्षेत्रात ( मुंबई उपनगर) एस.एस.सी.बोर्ड्‌ इंग्रजी माध्यमांची ९ वी १० तुकडी असलेली एकही शाळा नाही. आदर्श नगर मुंबई पब्लिक स्कूल येथे ९ वी व १० वी वर्ग्‌गाची परवानगी आहे. परंतु वर्ग खोली नसल्याने वर्ग चालू करता येत नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने विभागात जागा उपलब्ध केल्यास चालू शैक्षणिक वर्षापासून वर्ग सुरु करता येतील, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | १२३३ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील अनेक प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व बौद्धिक विकासासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्याची कमतरता आढळून येत आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, शैक्षणिक साहित्य, प्रयोग साहित्य व इतर शैक्षणिक साधने वेळेत उपलब्ध होत नाहीत. शैक्षणिक साहित्याच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची गुणवत्ता व बौद्धिक विकासावर परिणाम होत आहे. आधुनिक शिक्षणासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य व डिजिटल साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे सांगोला तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेशा निधीची तरतूद करून शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १२४४ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील प्राथमिक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती दुर्बल आहे. अनेक विद्यार्थ्यांना गणवेश, बूट व पायमोजे यांसारख्या मूलभूत शालेय साहित्याची कमतरता भासत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शाळेत नियमित उपस्थित राहणे व शिक्षण घेणे अडचणीचे ठरत आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी व शिक्षणात सातत्य राहण्यासाठी मोफत गणवेश, बूट व पायमोजे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे सांगोला तालुक्यातील प्राथमिक जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बूट व पायमोजे देण्यासाठी राज्य शासनाने विशेष निधीची तरतूद करून प्रभावी योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (५) | ११४१ | १० | भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने RFID कार्ड आधारित उपस्थिती प्रणाली उपलब्ध नसणे. विद्यार्थी शाळेत प्रवेश (Entry) व निर्गमन (Exit) करताना पालकांना तत्काळ SMS/मोबाईल ॲपद्वारे माहिती जाणे आवश्यक असणे. सध्या बहुतेक शाळांमध्ये अशी आधुनिक व्यवस्था नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत अनिश्चितता निर्माण होत असणे. त्यामुळे सर्व शाळांमध्ये RFID कार्ड, बायोमेट्रिक मशीन, गेट सेन्सर व संगणकीय प्रणाली तात्काळ उपलब्ध करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ११४२ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील शाळांची दुरुस्ती व देखभाल भंडारा जिल्हातील अनेक जिल्हा परिषद शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत असणे, पाणी गळती, शौचालय सुविधा अपुरी असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ११४४ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील बालिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना - शाळांमध्ये CCTV कॅमेरे, महिला सुरक्षा कर्मचारी नसणे. NEP (राष्ट्रीय शिक्षण धोरण) ची प्रभावी अंमलबजावणी नवीन अभ्यासक्रमासानुसार शिक्षकांना प्रशिक्षण नसणे. त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (८) | ११३३ | १० | “जि.सिंधुदुर्ग ता. दोडामार्ग घोटगे-परमे येथील श्री.धारेश्वर माध्यमिक विद्यालयाची सन २००४-२००५ ते २००७-२००८ या तीन वर्षाच्या कालावधीचे टप्पा अनुदान |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व त्यांनतर मार्च-२००९ ते डिंसेबर-२०१४ या कालावधीतील नियमित थकीत वेतन अनुदान रक्कम अद्यापपर्यंत देण्यात आली नसल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, तसेच सदर शाळेच्या समायोजन न झालेल्या २ शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे, जुलै-२०१८ पासून ते जानेवारी, २०२६ पर्यंतचे थकीत वेतन रक्कम, शिक्षण अधिकारी (माध्यमिक) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद यांनी श्री.धारेश्वर माध्यमिक विद्यालयास उपलब्ध करुन न देता थकित ठेवण्यात येणे, यामुळे सदरहू विद्यालयास शाळा चालविणे अर्थिक दृष्टया अंत्यत कठीण होणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होण्याची शक्यता असणे, सदरहू उक्त विद्यालयाची विविध टप्यातील थकीत अनुदान रक्कम मिळणेबाबत व समायोजनाबाबत मुख्याध्यापिका अस्मिता दळवी यांनी दि.२४.११.२०२५ व यापुर्वी अनेकवेळा शिक्षणधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा परिषद यांना लेखी पत्र देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ११४५ | १० | "राज्य शासनाने राज्यातील सुमारे ७.५ लाख शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुलै ते सप्टेंबर, २०२१ या तीन महीन्याच्या कालावधीतील घरभाडे फरकाची रक्कम अद्याप दिली नसल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास येणे, २४ टक्क्यावरुन २७ टक्क्यापर्यंत वाढवलेला भत्ता आक्टोंबर, २०२१ पासून लागू करण्यात येणे व त्यास 4 वर्ष इतका कालावधी होऊनही, फरकाची रक्कम उपलब्ध करुन देण्यात न येणे, घरभाडे फरकाची थकीत रक्कम प्रशासकीय मान्यता घेऊन, अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद करुन, उपलब्ध करुन देण्याचे तत्कालिन शिक्षण संचालकांनी दि.९ मार्च, २०२३ रोजी आदेश देऊन २ वर्षाहून अधिक कालावधी होऊनही, अद्याप यावर शासनाने कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यामध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे वातावरण, या संदर्भात शिक्षक संघटनांनी शासनास वांरवांर निवेदने देऊनही, यावर कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१०) | ११५९ | १० | विनाअनुदानित शाळांना सुरुवातीच्या वर्षांमध्ये टप्प्यांमध्ये अनुदान देण्याची शासनाची योजना असून पाचव्या वर्षी २०%, सहाव्या वर्षी ४०%, सातव्या वर्षी ६०%, आठव्या वर्षी ८०% व नवव्या वर्षापासून १००% अनुदान देण्याची तरतूद असणे, शासनाने वेळोवेळी या निकषांमध्ये सुधारणा केलेली असणे, दिनांक १९ सप्टेंबर २०१६ व ९ मे २०१८ च्या शासन निर्णयानुसार २० टक्के अनुदानावर कार्यरत शाळांना पुढील २० टक्के वाढीव अनुदान देण्याचा नियम लागू करण्यात आला असणे, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील शाळांना पुढील वाढीव टप्पा देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला असणे, परंतु सदर आदेशाची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, त्यामुळे अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक आर्थिक संकटात सापडलेले असणे, काही शिक्षकांनी तणावाखाली आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचललेले असणे, ही बाब अत्यंत गंभीर असणे, तरीही शासनाने या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणे हे अन्यायकारक व असंवेदनशील असणे, म्हणून दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून पात्र शाळा व तुकड्यांना वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करणे अत्यावश्यक असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (११) | १२२१ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघ मधील कुही, भिवापूर आणि उमरेड या तीनही तालुक्यांमधील प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी जिल्हा परिषदांना व त्यांच्या अंतर्गत विविध प्राथमिक शिक्षण शाळांना सहाय्य karne बाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे.उमरेड मतदारसंघातील अनेक ग्रामीण भागांमध्ये प्राथमिक शाळा आहेत, परंतु:शाळांमध्ये पुरेशी शिक्षण साधने, फर्निचर, शालेय साधने आणि शालेय इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नाही.शिक्षक, सहाय्यक कर्मचारी व प्रशासनाला सतत सहाय्य व निधीची आवश्यकता भासत आहे.ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश व शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होत आहे.या परिस्थितीत, शासनाने जिल्हा परिषदांना तातडीने निधी व सहाय्य उपलब्ध करून द्यावे जेणेकरून प्राथमिक शाळांमध्ये:योग्य शिक्षण साधने व फर्निचर उपलब्ध व्हावे.शिक्षकांना सहाय्य व प्रशिक्षण देऊन शिक्षणाची गुणवत्ता वाढवता यावी.शाळांचा भौतिक व शैक्षणिक विकास जलद गतीने करता यावा.म्हणून शासनाने पुढील बाबी कराव्यात अशी माझी मागणी आहे:कुही, भिवापूर व उमरेड तालुक्यातील जिल्हा परिषदांना प्राथमिक शिक्षणासाठी आवश्यक सहाय्य व निधी तत्काळ उपलब्ध करावा.शाळांमध्ये साहित्य, फर्निचर, शिक्षक सहाय्य व इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणा यासाठी आवश्यक निधी द्यावा.ग्रामीण भागातील शाळांमध्ये शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी विशेष योजना राबवावी. |
| (१२) | १२२८ | १० | राज्यात व्यवसाय शिक्षण योजनेतंर्गत राज्यातील ७४४ शासकीय आश्रमशाळा, जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपरिषदा च्या शाळांमध्ये १४८८ व्यवसाय शिक्षकांची त्रयस्थ संस्थामार्फत नियुक्ती करण्यात येणे, या त्रयस्थ संस्थामार्फत या व्यवसाय शिक्षकांची आर्थिक व मानसिक पिळवणूक केली जाणे, एसव्ही एज्युस्पोर्टस या कंपनीमधील वर्ष २०२२ ते २०२३ मध्ये २२ व्यवसाय शिक्षकाचे वेतन थांबविण्यात येणे, त्यामुळे हे शिक्ष व त्यांचे कुटूंबिय हलाखीचे जीवन जगत असणे, त्यांना नोव्हेंबर, डिसेंबर, २०२२ ते एप्रिल २०२३ पर्यतचे व एक वर्षाचा कार्यालयीन खर्च देण्यात न येणे, वेतन व कार्यालयीन खर्च मिळावा यासाठी वारंवार विचारणा केली असतानाही त्याकडे शासन -प्रशासन व सदर त्रयस्थ संस्था करित असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, सबब, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (१३) | १२५५ | १०० | शिक्षण हे कोणत्याही देशाच्या प्रगतीचे प्रमुख साधन असून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार असणे, परंतु गेल्या काही वर्षांत खाजगी शिक्षण संस्थांच्या वाढत्या फीमुळे शिक्षण हे सर्वसामान्य कुटुंबांसाठी परवडणारे राहिलेले नाही. दरवर्षी फीमध्ये ३० % ते ८० % पर्यंत वाढत्या शुल्कामुळे पालकांच्या आर्थिक स्थितीवर मोठा ताण येत आहे आणि शिक्षण क्षेत्रातील व्यापारीकरणाचा प्रश्न गंभीर बनत आहे. फक्त शिक्षण शुल्कच नव्हे तर प्रवेश शुल्क, विकास निधी, संगणक शुल्क, वाहतूक शुल्क, पुस्तक व गणवेश खर्च, वार्षिक कार्यक्रम शुल्क अशा अनेक प्रकारच्या अतिरिक्त शुल्कामुळे एकूण खर्च खूप वाढतो.शिक्षणाच्या वाढत्या खर्चामुळे मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांवर मोठा आर्थिक ताण निर्माण होत आहे. यामुळे अनेक पालक मानसिक तणावाखाली येतात आणि शिक्षण हे आर्थिक ओझे बनते गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे कठीण होते.म्हणून शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढवण्यासाठी सरकार, शाळा आणि पालक यांच्यात समन्वय असण्याची आवश्यकता याकरिता फी नियंत्रण कायदे कडक करणे, फी वाढीवर सरकारी देखरेख ठेवणे, पालक प्रतिनिधींना निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे, सरकारी शाळांची गुणवत्ता सुधारणे, शिक्षण क्षेत्रातील व्यापारीकरणावर नियंत्रण ठेवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१४) | १२२० | १० | ''शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर वंचित घटकांतील व आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणे, सदर प्रवेश प्रक्रिया प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येते. मात्र, शिक्षण विभागाने या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात नवी कार्यपद्धती जाहीर केली असून, त्यानुसार पालकांना आर.टी.ई. अंतर्गत प्रवेशासाठी १ किलोमीटर परिसरातील शाळांची निवड करण्याचे बंधन घालण्यात आलेले असणे, या अटीमुळे बहुसंख्य गरीब व वंचित विद्यार्थी दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, अनेक विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरच्या आत शाळा उपलब्ध नाहीत. अचानक ही अट लागू करण्यात आल्यामुळे अनेक पालकांसमोर त्यांच्या पाल्यांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, सदर अट रद्द करुन पालकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ई-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०४, क्रीडा व युवक सेवा**<br>**रूपये:- ७,४१,९८,१७,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (१५) | १२२४ | १० | श्रीरामपूर जि. अहिल्यानगर येथे नगरपरिषद हद्दीतील क्रीडा संकुलास मोठी जागा उपलब्ध आहे परंतु येथे क्रीडा विषयक सोयी सुविधा उपलब्ध नसणे,त्यामुळे शहरातील आबालवृद्धांना क्रीडा संकुलाचा उपयोग करता येत नसणे,श्रीरामपूर शहरातील क्रीडा संकुलास क्रीडा विषयक सोयी सुविधा उपलब्ध करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विश्वजित कदम** |
| (१६) | ११९० | १० | कडेगांव तालुक्यातील वांगी येथील क्रीडा संकूलाची सध्यस्थितीत ४०० मीटर धावन मार्ग, बहुउद्देशीय हॉल इत्यादी सुविधा तयार करणेत आलेल्या आहेत. सरावासाठी मैदनावरती दररोज मोठ्या संख्येने मुली व मुले असतात. परंतु सदर ठिकाणी अजून संरक्षण भिंत, प्रवेशद्वार, कुस्ती संकूल, पाणी साठवणुकीसाठी अंडरग्राउंड टाकी, हायमास्ट पोल, धावन मार्गाचे नूतनीकरण, अद्यावत क्रीडा साहित्य, या सर्व गोष्टींची कमतरता असलेने क्रीडा क्षेत्रातील मुलांचे नुकसान होत आहे. ही सर्व कामे करणे गरजेचे आहे. त्या साठी क्रीडा विभागाने या वरील कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची करवायची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय देरकर** |
| (१७) | ११४९ | १०० | राज्य शासनाने क्रीडा विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये क्रीडा योजनेच्या माध्यमातून साहित्य उपलब्ध करून देणे क्रीडा च्या इमारती, धावपट्ट्या, स्वच्छालय, तार जाळी कंपाउंड करणे,ह्या सगळया करिता ७ लक्ष रुपयाची मर्यादा दिलेली असणे, शासनाचे धोरणनुसार व  उदयोग ऊर्जा विभागाचे माध्यमातून खरेदी दर ठरवणे, बाबत नियमित शासन निर्णय निर्गमित करणे, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे माध्यमातून दर वर्षी बांधकाम साहित्य चे csr चे दर ठरविणे परंतु ते नियम क्रीडा विभागाचे साहित्य खरेदी, बांधकामना लागू करण्याची आवश्यकता असणे, तसेच ७ लाखावरून १०  लाखवार अनुदान देण्याबाबत क्रीडा विभागाचा प्रस्ताव मंत्री कार्यल्याकडे जाणे, त्या फाईलवर तातडीने निर्णय घेऊन ७ लाखावरून १० लाख रुपये अनुदानची घोषणा होणे, तो शासन निर्णय निर्गमित करून अनुदान वाढीची तातडीने शासनाने करावायची कार्यवाही व त्या वर उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे या विलंबा प्रकारणी शासना प्रति जनतेते, क्रीडा क्षेत्रातील युवक युवती मध्ये रोष असणे या प्रति शासनाने करावयाची  कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१८) | १२५१ | १० | राज्य शासनाने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी युवा धोरण निश्चित करून विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने युवकांना कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यासाठी युवा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील युवकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रत्येक तालुकानिहाय युवा प्रशिक्षण केंद्र असणे अत्यावश्यक आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात मोठ्या प्रमाणावर युवक असून त्यांना कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र युवा प्रशिक्षण केंद्राची आवश्यकता आहे. त्यामुळे सांगोला तालुक्यात युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करून त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करणे गरजेचे आहे, ज्यामुळे युवकांना प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१९) | १२२६ | १० | जोगेश्वरी (पूर्व ) येथील इस्माईल युसुफ कॉलेज येथे खेळाचे मेदान जिल्हा क्रीडा अधिका-यंच्या मार्गदर्शनाखाली विकसित करुन दर्जेदार मैदान बनविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | १२३१ | १० | जोगेश्वरी पूर्वमधील सार्वजनिक मैदाने क्रीडा पटूना खेळाडूंना प्रोत्साहन देण्याकरिता दहीहंडी साठी शासनाने खेळाच्या मैदानामध्ये (उदा. म्हाडा मैदान किंवा स्थानिक मनपा मैदाने) वापरण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) संबंधित विभाग कार्यालयाकडून परवानगी घ्यावी लागते त्यानुषंगाने सरावा करिता मैदान उपलब्ध करुन देण्या करिता आवश्यकता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना,. |
| (२१) | १२४१ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील सार्वत्रिक व दहीहंडी मंडळ असून जास्तीत जास्त थर रचून विक्रम करून या खेळात दिव्य यश मिळवण्याचा प्रयत्न करीत असतात त्यामध्ये कोकण नगर गोविंद पथक यांनी या वर्षी सर्वप्रथम दहा थर उभारून विश्वविक्रम केला त्याच बरोबर जय जवान गोविंद पथकाने एका दिवसात तीन वेळा दहा थरांची दहीहंडी उभारून वेगळा विश्वविक्रम केला आहे कोकण नगर आणि जय जवान या गोविंद पथकांनी २०२५ सालच्या दहीहंडी उत्सवात ऐतिहासिक कामगिरी करून जागतिक विक्रम प्रस्थापित केले आहेत या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनामार्फत विविध सुविधा व विमा कवच उपलब्ध करून दिले जाते अशा या गोविंद पथकांना सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्या बाबत यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२२) | ११४० | १० | राज्य शासनाने स्थानिक स्वराज संस्थेमधील जिल्हा परिषद-केंद्र स्तरावरील क्रीडा शिक्षकांच्या १०० टक्के ४८६० जागा भरणेबाबत दि.०२.०१.२०२६ रोजी शासन निर्णय जारी करुनही, अद्याप शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब निदर्शनास येणे, शालेय शिक्षण व्यवस्थेमध्ये शालेय शिक्षण हा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अंत्यत महत्वाचा असून, दृढ समाज निर्मिती, बलशाली भारत व ऑलिंपिक पदाचा या विषयाच्या माध्यमातून रचला जात असल्याने, या विषयाचे उदिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने प्रत्येक शाळेमध्ये क्रिडा शिक्षक नियुक्त करण्याची अत्यंत आवश्यकता असून, सदरहू केंद्रस्तरावरील ४८६० क्रिडा शिक्षक पदभरती टेट २०२५ च्या परिक्षेतून करणे, सदरहू क्रिडा शिक्षक पदभरती संदर्भात शासन निर्णय १५.०३.३०२४ नुसार पवित्र पोर्टलचे नोटिफिकेशन नुसार सबंधित शासकीय, निमशासकीय, खाजगी शाळांना प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निर्देश देण्याची आवश्यकता, शासन जारी करुनही अद्याप क्रिडा शिक्षकांची पदे भरणेबाबत श्री. तायप्पा शेंडे, सचिव,महाराष्ट्र राज्य, युवा शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघ यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी मा. मंत्री महोदयांना लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२३) | ११५७ | १० | राज्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण स्तरावर क्रीडा संस्कृती रुजविणे आवश्यक असल्याची शासनाची भूमिका असणे, प्राथमिक शाळांमध्ये महाराष्ट्रात कुठेही क्रीडा शिक्षक कार्यरत नाही तर माध्यमिक शाळांमधील हजारो क्रीडा शिक्षकांची पदे सध्या रिक्त असणे, जिल्हा परिषद केंद्र शाळांसाठी ४,८६० क्रीडा शिक्षक पदांना मंजुरी देण्यात आली आहे, परंतु या मंजूर पदांवर अद्याप कोणतीही ठोस भरती प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नसणे, राज्यातील क्रीडा शिक्षकांच्या पदभरतीसाठी नवीन व जुनी रिक्त पदे भरण्याचे शासनाचे स्पष्ट धोरण अद्याप जाहीर झालेले नसणे, पवित्र पोर्टलद्वारे प्राथमिक व माध्यमिक विभागाचे सर्व रिक्त क्रीडा शिक्षक पदे तात्काळ भरण्याचा शासनाचा विचार असून प्रत्येक जिल्हा परिषद केंद्र शाळेत किमान एक क्रीडा शिक्षक नियुक्त करण्या बाबत शासन विचाराधीन असणे, असल्यास प्राथमिक व माध्यमिक विभागातील जिल्हा परिषद केंद्र शाळांमध्ये व खाजगी संस्थेसह जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची नवीन व रिक्त पदांची पदभरती कधी व किती दिवसात करण्यात येईल याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | १२२२ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघ मधील कुही, भिवापूर आणि उमरेड या तीनही तालुक्यांमधील शासकीय क्रीडा मैदानांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे. मागील अनेक वर्षांपासून या मतदारसंघात पाच ते सहा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | एकरपेक्षा मोठी क्रीडा मैदाने अस्तित्वात आहेत. परंतु यांचा उपयोग होणे अत्यंत कमी प्रमाणात आहे. अनेक मैदाने बंद पडलेली आहेत, जिथं १.मैदानाची देखभाल होत नसल्यामुळे जंगलरूपी वनस्पती, ऊस व झुडुपे पसरलेली आहेत, २.स्थानिक नागरिकांना किंवा विद्यार्थ्यांना खेळासाठी मैदान उपलब्ध नाही. ३.अनेक ठिकाणी अनधिकृत वस्ती किंवा जुगारप्रवृत्तीमुळे मैदानाचा वापर करता येत नाही. सध्या क्लस्टर शाळा योजना अंतर्गत शाळा उभारणीचा प्रस्ताव मार्गी लावण्यात आला आहे. उमरेड विधानसभा मतदारसंघात क्लस्टर शाळा यशस्वीपणे सुरू झाल्या आहेत. त्याप्रमाणे, उमरेड मतदारसंघातील बंद पडलेली शासकीय क्रीडा मैदानं शैक्षणिक व क्रीडा दोन्ही उद्देशासाठी वापरली जावीत. म्हणून शासनाने पुढील बाबी कराव्यात अशी माझी मागणी आहे, उमरेड विधानसभा मतदारसंघातील बंद पडलेल्या क्रीडा मैदानांना शाळांमध्ये रूपांतरित करणे, नवीन शाळांमध्ये पूर्ण शिक्षण सुविधा, क्रीडा संकुल व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देणे, या शाळांमधील मैदानांचा स्थानिक नागरिक व विद्यार्थी दोन्हींसाठी खेळासाठी वापर सुनिश्चित करणे, शाळांच्या विकासासाठी शैक्षणिक व क्रीडा प्रशासनाचा समन्वय साधून आवश्यक निधी व साधने उपलब्ध करून देणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ई-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- २,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (२५) | १२०० | १० | मी उमरेड मतदार संघ तसेच राज्यातील इतर भागांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व इतर बहुजन समाजातील युवक-युवतींना क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही कपात सूचना मांडत आहे.राज्यातील अनेक युवक-युवतींमध्ये क्रीडा क्षेत्रात प्रचंड क्षमता असूनही त्यांना योग्य प्रशिक्षण, क्रीडा सुविधा, खेळाची मैदाने, प्रशिक्षक व आर्थिक मदत उपलब्ध होत नाही. विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व इतर बहुजन समाजातील खेळाडूंना प्रोत्साहन व मार्गदर्शनाचा अभाव असल्यामुळे त्यांची गुणवत्ता पुढे येऊ शकत नाही.जर शासनाने या समाजातील युवक-युवतींसाठी विशेष क्रीडा विकास योजना, प्रशिक्षण केंद्रे, क्रीडा वसतिगृहे, शिष्यवृत्ती व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर राज्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम खेळाडू मिळू शकतात, म्हणून शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक व इतर बहुजन समाजातील युवक-युवतींना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना राबवाव्यात, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अधिक क्रीडा संकुले व प्रशिक्षण केंद्रे उभारावीत, तसेच खेळाडूंना शिष्यवृत्ती व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई